नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २५१ Issue - 251 | वार शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ Blow- Saturday Date 31 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महायुतीचा मुंबईचा सत्तावाटपाचा फॉर्म्युला निश्चित

## मुंबई महापालिकेत भाजपचा महापौर तर शिवसेनेचा उपमहापौर होणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महायुतीत भाजप आणि शिवसेना यांच्यातील मुंबई महापालिकेतील सत्तेचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाला आहे. भाजप आणि शिवसेनेचा ठाणे, कल्याण डोंबिवली आणि उल्हासनगर नंतर मुंबईचा फॉर्म्युला देखील जवळपास निश्चित झाल्याची माहिती आहे. मुंबई महापालिकेत महापौरपद भाजप कडे, स्थायी समितीचं अध्यक्षपद भाजपकडे असणार आहे. तर, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला उपमहापौर पद मिळण्याची शक्यता आहे. यामुळं मुंबई महापालिकेत भाजपचा महापौर होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

महापालिकेतील सत्ता समीकरणांसदर्भात काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासोबत वेगवेगळी बैठक झाली होती, त्या बैठकीत मुंबई महापालिकेतील सत्तेचा फॉर्म्युला ठरल्याची सूत्रांची माहिती आहे.

महायुतीत येणाऱ्या काळात महापौर आणि स्थायी समिती अध्यक्षपद शिवसेनेलाही मिळेल, मात्र आता ही दोन्ही पदं भाजपकडे राहणार असल्याची शक्यता आहे. प्रभाग समिती संदर्भात स्थानिक पातळीवर निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती आहे.

ठाणे, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर इथे शिवसेनेचा महापौर आणि भाजपच्या उपमहापौर असेल. तर, मुंबईत भाजपचा महापौर तर शिवसेनेचा उपमहापौर असणार आहे, अशी माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

मुंबई महापालिकेत भाजपचे यापूर्वी प्रभाकर पै महापौर बनले होते. ते १९८२ मध्ये मुंबईचे महापौर होते. आता पुन्हा एकदा मंबई महापालिकेत भाजपचा महापौर होणार आहे. तब्बल २५ वर्षांनंतर ठाकरेंची मुंबई महापालिकेतील सत्ता जाऊन महापौरपदी भाजपकडे येणार आहे. यापूर्वी अनेक वर्ष मुंबई महापालिकेत शिवसेना आणि भाजपची युती होती.

ठाणे, कल्याण डोंबिवलीत महापौर पद शिवसेनेकडे

ठाणे महापालिकेच्या महापौदपदासाठी शर्मिला पिंपळोलकर-गायकवाड यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. तर, उपमहापौरपदासाठी भाजपच्या कृष्णा पाटील यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.



कल्याण डोंबिवलीत शिवसेनेच्या हर्षाली थविल यांचा महापौरपदासाठी अर्ज

कल्याण डोंबिवली महापालिका महापौर पदाचा उमेदवारी अर्ज हर्षाली थविल यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे. हर्षाली थविल यांची महापौरपदी बिनविरोध निवडीची अधिकृत घोषणा ३ फेब्रुवारीच्या सर्वसाधारण सभेत होणार आहे. तर उपमहापौर राहुल दामले यांचा भाजपकडून एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने दामले यांची उपमहपौर पदी बिनविरोध निवड झाली आहे.

# सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री होणार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अजितदादांच्या पश्चात राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी कुणाला मिळणार याचं उत्तर आता मिळालं आहे. सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्रिपद स्वीकारण्यास तयार झाल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची शनिवारी दुपारी बैठक होणार असून त्यामध्ये सुनेत्रा पवार यांची गटनेतेपदी निवड होणार आहे. त्यानंतर संध्याकाळी पाच वाजता त्यांचा शपथविधी होणार आहे. डिझाईन बॉक्सचे प्रमुख नरेश अरोरा हे सुनेत्रा पवार यांचा निरोप घेऊन मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये एक मोठी पोकळी झाल्याची भावना निर्माण झाली होती. त्यातून बाहेर येण्यासाठी उपमुख्यमंत्रिपद सुनित्रा पवार यांनी स्वीकारावं अशी मागणी करण्यात येत होती. तसेच राष्ट्रवादीचे प्रमुखपदही त्यांच्याकडेच राहावं यासाठी अनेकजण प्रयत्नशील होते.

पक्षाकडून होत असलेल्या आग्रहानंतर सुनेत्रा पवार आता उपमुख्यमंत्रिपद स्वीकरण्यास तयार झाल्या आहेत. अजित



पवारांच्या जाहिरातीचे काम पाहणाऱ्या डिझाईन बॉक्स कंपनीचे प्रमुख नरेश अरोरा आणि राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केल्यानंतर त्यांनी हा निर्णय घेतल्याची माहिती आहे. शनिवारी, राष्ट्रवादीच्या विधीमंडळाच्या गटनेतेपदी निवड होणार आहे. सुनेत्रा पवार यांची त्या पदावर निवड होणार आहे.

अजित पवारांच्या अस्थी विसर्जनाचा कार्यक्रम झाल्यानंतर व्हिडीओ कॉन्फरंसिंगच्या माध्यमातून सुनेत्रा पवार आणि राष्ट्रवादीच्या इतर पाच बड्या नेत्यांची बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय झाल्याची माहिती आहे.

राष्ट्रवादीने घेतलेल्या या निर्णयाची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिली जाणार आहे. त्यानुसार शनिवारी संध्याकाळी सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्रिपदाचा शपथविधी होणार आहे.

अजित पवार यांच्याकडे अर्थखातं, क्रीडा आणि राज्य उत्पादन शुल्क खातं होतं. ही महत्त्वाची खाती कुणाला द्यायची यावरही खलबतं केली जात आहेत. तसेच सर्वात महत्त्वाचं असलेलं अर्थखातं हे आपल्याकडेच राहावं असा राष्ट्रवादीचा प्रयत्न असेल. दरम्यान, राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यामध्ये बंद दाराआड तब्बल ४५ मिनिटांहून अधिक चर्चा झाल्याची माहिती आहे.

अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसला एकसंध बांधण्यासाठी पवार कुटुंबीयांमधील कुणाकडे तरी पक्षाची धुरा असावी असं मत भाजपच्या नेतृत्वाचं असल्याची माहिती आहे. त्यामुळेच पक्षप्रमुख म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची देखील माहिती आहे.

### मुले आणि मुलींसाठी स्वतंत्र शौचालये बांधा; सुप्रीम कोर्टाचे निर्देश

# देशातील सर्व खासगी आणि सरकारी शाळांना मुलींना मोफत सॅनिटरी पॅड वाटणे बंधनकारक करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी देशातील सर्व खासगी आणि सरकारी शाळांना मुलींना मोफत सॅनिटरी पॅड वाटणे बंधनकारक करण्याचे निर्देश दिले. मुलांसाठी आणि मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधली पाहिजेत. ज्या शाळांनी असे केले नाही त्यांना मान्यता रद्द करावी लागेल. न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना प्रत्येक शाळेत अपंगांसाठी अनुकूल शौचालये बांधण्याचे निर्देश दिले. केंद्र सरकारच्या मासिक पाळी स्वच्छता धोरणाची देशभर अंमलबजावणी करण्याची मागणी करणाऱ्या जया ठाकूर यांनी २०२४ दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला.

जर शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालये नसतील तर ते संविधानाच्या कलम १४ (समानतेचा अधिकार) चे उल्लंघन करते. सॅनिटरी पॅडशिवाय मुली त्यांच्या अभ्यासात आणि अभ्यासेतर उपक्रमांमध्ये मुलांसोबत समान सहभाग घेऊ शकत नाहीत. मासिक पाळीच्या वेळी आदरयुक्त काळजी मिळणे हा संविधानाच्या कलम २१ चा भाग आहे (जीवन आणि सन्मानाचा अधिकार). जर मुलींना योग्य काळजी मिळाली नाही तर त्यांची प्रतिष्ठा आणि गोपनीयता धोक्यात येते.



हा आदेश केवळ कायदेशीर व्यवस्थेत सामील असलेल्यांसाठी नाही. हा आदेश अशा वर्गखोल्यांसाठी देखील आहे जिथे मुली मदत घेण्यास कचरतात. हे अशा शिक्षकांसाठी देखील आहे जे मदत करू इच्छितात परंतु संसाधनांच्या कमतरतेमुळे अडचणीत आहेत. हे अशा पालकांसाठी देखील आहे ज्यांना त्यांच्या मौनाचा परिणाम समजत नाही. हे समाजासाठी देखील आहे, जेणेकरून प्रगतीचे मोजमाप आपण आपल्या सर्वात असुरक्षित मुलांचे किती चांगले संरक्षण करतो यावरून होते. आम्हाला हा संदेश प्रत्येक मुलीला द्यायचा आहे जी शाळेत अनुपस्थित राहिली आहे कारण तिचे शरीर ओझे मानले जात होते, जरी ती तिची चूक नव्हती.

सामाजिक कार्यकर्त्या जया ठाकूर यांनी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आणि मुलींच्या आरोग्याबद्दल चिंता व्यक्त केली. याचिकेत म्हटले आहे की अनेक मुली त्यांच्या मासिक पाळीच्या वेळी येणाऱ्या समस्यांमुळे शाळा सोडतात, कारण त्यांच्या कुटुंबांकडे पॅडसाठी पैसे नसतात आणि त्या दिवसांत कापड वापरून शाळेत जाणे हे एक आव्हान आहे. शाळांमध्ये मुलींसाठी मोफत पॅडची कमतरता आहे, ज्यामुळे त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. शिवाय, शाळांमध्ये वापरलेले पॅड विल्हेवाट लावण्याची सुविधा नाही, ज्यामुळे मुलींना मासिक पाळीच्या वेळी शाळेत जाता येत नाही.

### शासनाने काढलेल्या जीआरमध्ये काय?

# राज्य सरकारकडून सरकारी विमानं आणि हेलिकॉप्टर्ससंदर्भात महत्त्वाचा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य सरकारकडून सरकारी विमानं आणि हेलिकॉप्टर्ससंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारी हवाई वाहनांच्या तातडीच्या महत्त्वाच्या कामांसाठी ६ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. डिसेंबर २०२५च्या पुरवणी मागण्यांद्वारे सरकारी हवाई वाहनांसंदर्भात मागणी करण्यात आली होती. यानंतर आता वित्त विभागाच्या व्यय अग्रक्रम समितीने खर्चास मंजुरी दिली आहे. प्रत्येकी ३ कोटींच्या दोन पुरवणी मागण्यांद्वारे ६ कोटींची मागणी केली होती. यावर लहान बांधकामे व यंत्रसामुग्री व साधनसामुग्री उद्दीष्टासाठी वित्त विभागाची संमती दिली आहे.



शासनाच्या मालकीच्या हवाई वाहनांच्या तातडीच्या महत्वाच्या कामांकरीताचा संभाव्य खर्च भागविण्यासाठी मागणी क्र. ए-४, लेखाशीर्ष क्र.२०७० ०१५६ (अनिवार्य) मधील २७-लहान बांधकामे व ५२-यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या उद्दिष्टांतर्गत अनुक्रमे रु.३,००,००,०००/- व रु.३,००,,/- अशा एकूण रु.६,००,००,०००/- (रु. सहा कोटी फक्त) इतक्या रक्कमेच्या पुरवणी मागणीच्या प्रस्तावास वित्त विभागाच्या व्यय अग्रक्रम समितीने मान्यता दिली असून, सदर पुरवणी मागणी डिसेंबर, २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात विधीमंडळात मान्य करण्यात आली आहे. सदर पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेला एकूण रु.६,००,००,०००/- (रु. सहा कोटी फक्त) इतका निधी बीम्स प्रणालीवर वितरीत करण्यास वित्त विभागाने सहमती दर्शविली आहे. त्यानुसार सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

१. वित्त विभागाने प्रदान केलेल्या सहमतीस अनुसरुन, शासनाच्या मालकीच्या हवाई वाहनांच्या तातडीच्या महत्वाच्या कामांकरीताचा संभाव्य खर्च भागविण्यासाठी लेखाशीर्ष २०७० ०१५६, २७-लहान बांधकामे व ५२-यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या उद्दिष्टांतर्गत विधानमंडळाच्या डिसेंबर, २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुक्रमे रु.३,००,००,०००/- व रु.३,००,००,०००/- अशा एकूण रु.६,००,००,०००/- (रु. सहा कोटी फक्त) इतक्या निधीचे बीम्स प्रणालीवर वितरण करुन खर्च करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला निधी कोषागारातून आहरण व वितरण करण्यासाठी उप संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून आणि संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर पुरवणी मागणीव्दारे उपलब्ध करुन दिलेला निधी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी खर्ची पडेल याची दक्षता उपसंचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांनी घ्यावी. तसेच केलेल्या खर्चाचा तपशिल व उपयोगिता प्रमाणपत्र (णींळश्रळूरींळेप उशीींळषळलरींश) विहीत मुदतीत शासनास आणि महालेखापाल कार्यालयास सादर करण्याची त्याचप्रमाणे महालेखापालांच्या लेख्यांशी खर्चाचा ताळमेळ घालण्याची जबाबदारी संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांची राहील.

३. उपरोक्त निधी मागणी क्र. ए-४, २०७० इतर प्रशासनिक सेवा (००) (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (००) (०२) विमानचालन सल्लागार, (२०७००१५६) महाराष्ट्र शासन (अनिवार्य) या लेखाशीर्षातंर्गत २७-लहान बांधकामे व ५२-यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या उद्दिष्टांखाली खर्ची टाकण्यात यावा. ४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२८/व्यय-४, दि.२१/०१/२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या ु.ारहरीरिहींर.सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०१२९१७५३१३५७०७ असा आहे. हे आदेश डिजिटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

# दादांच्या निधनाने कोसळलेले शरद पवार पुन्हा उभे राहिले, नीरेच्या पाहणीसाठी पोहोचले, बारामतीची सूत्रं पुन्हा हाती घेतली!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : शरद पवार नावाची व्यक्ती नेमकं काय रसायन आहे हे भल्याभल्यांना समजलं नाही म्हटलं जातं, त्याचीच पुन्हा एकदा प्रचिती आल्याचं दिसंतय. अजित पवारांच्या निधनानंतर एकीकडे उपमुख्यमंत्रिपद कुणाला मिळणार याची चर्चा सुरू असताना दुसरीकडे स्वतः शरद पवार बारामतीच्या राजकारणात सक्रिय झाल्याचं दिसून आलं. बारामतीतून वाहणाऱ्या नीरा नदीच्या प्रदूषणाची पाहणी करण्यासाठी शरद पवार हे थेट नदीकाठी पोहोचले.



अजित पवारांच्या अपघाती मृत्यूनंतर शरद पवार हे भावुक झाल्याचं अनेकांनी पाहिलं. त्यांच्या निधनानंतर बारामती पोरकी झाली, त्याचे पुढे काय होणार अशी चर्चा सुरू झाली. त्याचवेळी आता शरद पवार हे स्वतः राजकारणात पुन्हा एकदा सक्रिय झाल्याचं बारामतीकरांनी पाहिलं. शरद पवार बारामतीतून वाहणाऱ्या निरा नदीची पाहणी करण्यासाठी पोहोचले. बारामती शेजारील नीरा वाघज गावात नीरा नदीच्या प्रदूषणाची पाहणी शरद पवारांकडून करण्यात आली.

अनेक वर्षांपूर्वी शरद पवारांनी बारामतीचा कारभार अजित पवारांकडे सोपवला होता आणि स्वतः देशाच्या राजकारणात लक्ष घातलं होतं. तेव्हापासून अजित पवार बारामतीच्या समस्यांचे निराकरण करायचे. मात्र, अजित पवारांच्या अपघाती मृत्यूनंतर बारामतीची सूत्रे स्वतः शरद पवारांनी हाती घ्यायचं ठरल्याचं दिसतंय.

एकीकडे अजित पवारांच्या अस्थींचे विसर्जन करण्यासाठी पवार कुटुंबीय बारामती जवळील सोनगावमध्ये पोहचले. त्याचेवेळी शरद पवार मात्र नीरा वाघज गावात प्रदूषित नदीची पाहणी करण्यासाठी पोहोचल्याचं दिसतंय. अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादीचे नेत्यांनी सुनेत्रा पवारांनी बारामतीचं नेतृत्व करावं अशी गळ घातल्याचं दिसतंय. सुनेत्रा पवारांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देऊन बारामतीमधून विधानसभा लढवावी आणि उपमुख्यमंत्रिपद घ्यावं. तसेच पार्थ पवारांनी राज्यसभेवर जावं यासाठी काही ज्येष्ठ नेते प्रयत्नशील आहेत. तसेच अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे अस्तित्वही स्वतंत्र राहावे यासाठीही प्रयत्न केले जात आहेत. नेमक्या त्याच वेळी आता शरद पवार पुन्हा बारामतीमध्ये सक्रिय झाल्याचं दिसून येतंय. बारामती आणि शरद पवार हे जुनं नातं पुन्हा अधोरेखीत करण्याचा प्रयत्न असल्याचा हा प्रयत्न असल्याचीही चर्चा आहे.

## संपादकीय....

### कर्तव्यपथावर...

शरद पवार नावाची व्यक्ती नेमकं काय रसायन आहे हे भल्याभल्यांना समजलं नाही म्हटलं जातं, त्याचीच पुन्हा एकदा प्रचीती आल्याचं दिसंतय. अजित पवारांच्या निधनानंतर एकीकडे उपमुख्यमंत्रिपद कुणाला मिळणार याची चर्चा सुरू असताना दुसरीकडे स्वतः शरद पवार बारामतीच्या राजकारणात सक्रिय झाल्याचं दिसून आलं. बारामतीतून वाहणाऱ्या नीरा नदीच्या प्रदूषणाची पाहणी करण्यासाठी शरद पवार हे थेट नदीकाठी पोहोचले. अजित पवारांच्या अपघाती मृत्यूनंतर शरद पवार हे भावुक झाल्याचं अनेकांनी पाहिलं. त्यांच्या निधनानंतर बारामती पोरकी झाली, त्याचे पुढे काय होणार अशी चर्चा सुरू झाली. त्याचवेळी आता शरद पवार हे स्वतंः राजकारणात पुन्हा एकदा सक्रिय झाल्याचं बारामतीकरांनी पाहिलं. शरद पवार बारामतीतून वाहणाऱ्या निरा नदीची पाहणी करण्यासाठी पोहोचले. बारामती शेजारील नीरा वाघज गावात नीरा नदीच्या प्रदूषणाची पाहणी शरद पवारांकडून करण्यात आली. अनेक वर्षांपूर्वी शरद पवारांनी बारामतीचा कारभार अजित पवारांकडे सोपवला होता आणि स्वतः देशाच्या राजकारणात लक्ष घातलं होतं. तेव्हापासून अजित पवार बारामतीच्या समस्यांचे निराकरण करायचे. मात्र, अजित पवारांच्या अपघाती मृत्यूनंतर बारामतीची सूत्रे स्वतः शरद पवारांनी हाती घ्यायचं ठरल्याचं दिसतंय. एकीकडे अजित पवारांच्या अस्थींचे विसर्जन करण्यासाठी पवार कुटुंबीय बारामती जवळील सोनगावमध्ये पोहचले. त्याचेवेळी शरद पवार मात्र नीरा वाघज गावात प्रदूषित नदीची पाहणी करण्यासाठी पोहोचल्याचं दिसतंय. अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादीचे नेत्यांनी सुनेत्रा पवारांनी बारामतीचं नेतृत्व करावं अशी गळ घातल्याचं दिसतंय. सुनेत्रा पवारांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देऊन बारामतीमधून विधानसभा लढवावी आणि उपमुख्यमंत्रिपद घ्यावं. तसेच पार्थ पवारांनी राज्यसभेवर जावं यासाठी काही ज्येष्ठ नेते प्रयत्नशील आहेत. तसेच अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे अस्तित्वही स्वतंत्र राहावे यासाठीही प्रयत्न केले जात आहेत. नेमक्या त्याच वेळी आता शरद पवार पुन्हा बारामतीमध्ये सक्रिय झाल्याचं दिसून येतंय. बारामती आणि शरद पवार हे जुनं नातं पुन्हा अधोरेखीत करण्याचा प्रयत्न असल्याचा हा प्रयत्न असल्याचीही चर्चा आहे. नीरा नदीच्या प्रदूषणाबाबत अजित पवार यांनी ह्यात असताना गांभीर्याने लक्ष घातले होते. खाजगी कारखान्यांतून सोडण्यात येणाऱ्या रासायनिक पाण्यामुळे नीरा नदीचे पाणी मोठ्या प्रमाणावर प्रदूषित झाले होते. काही दिवसांपूर्वी या प्रदूषणामुळे नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर मासे मृत्युमुखी पडल्याची घटना घडली होती. या घटनेमुळे नदीकाठच्या नागरिकांमध्ये आणि शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली होती. शेतकऱ्यांनी हा गंभीर प्रकार थेट उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शरद पवार यांच्या कानावर घातला होता. यावेळी अजित पवार यांनी शेतकऱ्यांना नीरा नदी प्रदूषणमुक्त करण्याचे ठाम आश्वासन दिले होते.

# विपश्यना : आत्मक्रांतीचा विज्ञान आणि मनाच्या मुक्तीचा महामार्ग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आजचा मनुष्य बाह्य जग जिंकण्यात गुंतला आहे; पण स्वतःला जिंकण्याचे सामर्थ्य हरवत चालला आहे. विज्ञानाने जग जवळ आणले, पण मन दूर गेले. माहिती वाढली, पण शांती कमी झाली. प्रगती झाली, पण समाधान हरवले. अशा काळात मनुष्याला सर्वात जास्त गरज आहे ती मनाची साधना आणि या साधनेचा सर्वात शुद्ध, वैज्ञानिक आणि प्रभावी मार्ग म्हणजे विपश्यना. विपश्यना म्हणजे ध्यान नव्हे, धर्म नव्हे, कर्मकांड नव्हे तर ती आहे मनुष्याच्या अंतर्मनावर केलेली वैज्ञानिक शस्त्रक्रिया. मिथ्या, आडंबर आणि अंधश्रद्धेपासून मुक्त असलेली ही साधना अनुभवावर आधारित आहे. श्रद्धेवर नव्हे, तर सत्याच्या प्रत्यक्ष अनुभूतीवर उभी असलेली ही विद्या मनुष्याला दुःखाच्या मुळांपर्यंत घेऊन जाते आणि त्यातून मुक्त होण्याचा मार्ग दाखवते.

विपश्यना ही साधना तथागत गौतम बुद्धांनी मानवतेला दिलेली अमूल्य देणगी आहे. बुद्धांनी जगाला सांगितले की, दुःख बाहेर नाही, ते आपल्या आत आहे. लोभ, राग, द्वेष, भय, अहंकार, आसक्ती याच मनुष्याच्या दुःखाच्या मूळ कारणे आहेत. बुद्धांनी बाह्य पूजा-अर्चा नव्हे, तर अंतर्मनाची साधना शिकवली. त्यांनी सांगितले मनाला पाहा, मनाला ओळखा, मनाला शुद्ध करा. विपश्यना म्हणजे स्वतःकडे पाहण्याची कला. श्वासावर लक्ष केंद्रित करून सुरू होणारी ही साधना हळूहळू मनाच्या खोल स्तरावर पोहोचते. शरीरात निर्माण होणाऱ्या संवेदनांचे निरीक्षण करताना साधकाला जाणवते की, सर्व काही क्षणभंगुर आहे. सुखही क्षणिक आहे, दुःखही क्षणिक आहे. याच अनुभूतीतून मनाला समत्व प्राप्त होते. प्रतिक्रिया देण्याऐवजी निरीक्षण करण्याची क्षमता निर्माण होते आणि याच क्षणी मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वात क्रांती सुरू होते.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

विपश्यना ही केवळ ध्यानपद्धती नाही; ती मनुष्याच्या स्वभावावर केलेली शुद्धी प्रक्रिया आहे. या साधनेमुळे लोभ कमी होतो, राग निवळतो, भय दूर होते, हिंसेची प्रवृत्ती कमी होते, व्यसनांची साखळी सैल होते. मनुष्य संयमी, विवेकी आणि करुणामय बनतो. विपश्यना म्हणजे मनुष्याला स्वतःच्या दोषांचे दर्शन घडविणारी आरसा आहे. जेव्हा मनुष्य स्वतःला ओळखतो, तेव्हाच तो स्वतःला बदलू शकतो. ही साधना श्रद्धेवर नव्हे, तर अनुभवावर आधारित आहे. म्हणूनच ती धर्मापलीकडे जाते. बुद्धांनी प्राप्त केलेली अवस्था म्हणजे सम्यक संबुद्धी. ही अवस्था ध्यानाने नव्हे, तर चित्तशुद्धीने प्राप्त होते. बुद्धाचे मन कठोर होते, पण करुणामय होते. तटस्थ होते, पण संवेदनशील होते. दृढ होते, पण कोमल होते. बुद्धत्व म्हणजे देवत्व नव्हे, तर मानवतेचा सर्वोच्च स्तर. आणि त्या स्तरापर्यंत जाण्याचा मार्ग म्हणजे विपश्यना.

विडंबन म्हणजे, बुद्धभूमी असलेल्या भारतातच ही विद्या कालांतराने लुप्त झाली. बुद्धवाणीचा आवाज मंदावत गेला. म्यानमारमध्ये मात्र काही साधकांनी या विद्येचे शुद्ध स्वरूप जपले. सुमारे दोन हजार वर्षे ही परंपरा टिकून राहिली. १९६९ मध्ये गुरुदेव सयाजी ऊ बा खिन यांच्या परंपरेतून सत्यनारायण गोयंकाजींनी विपश्यना पुन्हा भारतात आणली. ही विद्या परकी नव्हती; ती भारताचीच होती.

पण काळाच्या प्रवाहात विस्मरणात गेलेली होती. आज भारतातच नव्हे, तर जगातील जवळपास ९० देशांत विपश्यनेचा प्रकाश पसरलेला आहे. आजचा मनुष्य भौतिकदृष्ट्या संपन्न झाला आहे, पण मानसिकदृष्ट्या दरिद्री झाला आहे. स्पर्धा वाढली, पण समज कमी झाली. संपत्ती वाढली, पण समाधान कमी झाले. सुविधा वाढल्या, पण शांती हरवली. अशा परिस्थितीत विपश्यना म्हणजे मनासाठी औषध आहे.

जिथे मनाला विश्रांती मिळते,
जिथे विचारांना दिशा मिळते,
जिथे आत्म्याला प्रकाश मिळतो.

आज जगभरात हजारो विपश्यना केंद्रे कार्यरत आहेत. शिबिरात कोणतेही शुल्क घेतले जात नाही. जेवण, निवास, शिक्षण सर्व नि:शुल्क. हीच विपश्यनेची महानता आहे, व्यवसाय नव्हे, सेवा. विपश्यना व्यक्तीला बदलते आणि बदललेली व्यक्ती समाज बदलते. जेव्हा मनुष्य आतून शांत होतो, तेव्हा समाजातही शांतता निर्माण होते. हिंसा कमी होते, द्वेष कमी होतो, संघर्ष कमी होतो. म्हणूनच विपश्यना ही केवळ आध्यात्मिक साधना नाही; ती सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. विपश्यना म्हणजे स्वतःला जाणण्याचा, स्वतःला बदलण्याचा आणि स्वतःपासून मुक्त होण्याचा मार्ग. आजच्या अस्थिर, असंतुलित आणि अस्वस्थ जगात मनुष्याला जर खरे समाधान हवे असेल, तर त्याला बाहेर नव्हे, आत पाहावे लागेल आणि आत पाहण्याची कला म्हणजेच विपश्यना होय.

भवतु सब्ब मंगलम् !

सर्वांचे मंगल होवो, हीच बुद्धाची आणि विपश्यनेची अंतिम प्रार्थना.

# २६ जानेवारी २०२६ रोजी दिवा स्थानक सदरम्यान शालीमार एक्सप्रेस ट्रेनच्या एका चाकाला अचानक लागली आग कोणतीही जीवितहानी नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/बाळासाहेब अहिरे : २६ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२:३१ वाजता, ४४/४३५-४४/५४० किमी UP/TH लाईनवरील कोपर आणि दिवा स्थानकांदरम्यान, शालीमार एक्सप्रेस ट्रेनच्या एका चाकाला अचानक आग लागली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, तात्काळ कारवाई करण्यात आली.



रेल्वे कर्मचारी

१) लहू सोनवणे,
२) बिमल कुमार
३) अमित कुमार यांनी

, वेळ वाया न घालवता, एकमेकांशी समन्वय साधून आवश्यक सुरक्षा उपाययोजना करत आग विझवण्यास सुरुवात केली. उपलब्ध संसाधनांचा वापर करून, आग त्वरित आटोक्यात आणण्यात आली, ज्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही व मोठी दुर्घटना टळली. घटनेनंतर, संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली आणि ट्रेनची पुढील चौकशी आणि आवश्यक कारवाई सुनिश्चित करण्यात आली.

# पंढरपूर नगरपरिषद विविध समिती सभापतींच्या निवडी बिनविरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपरिषद बुधवारी विशेष समितीच्या सभापती निवडी बिनविरोध करण्यात आले.

काही दिवसांपूर्वी उपनद्या शिवा स्वीकृत नगरसेवक यांच्या निवडी करण्यात आल्या बुधवारी निवड समिती व सदस्य निवडीचा कार्यक्रम निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी जाहीर केला होता त्यानुसार ही निवड पार पडली.

नियोजन व विश्वस्त समिती सभापती उपनद्याक्ष महादेव धोत्रे समिती सभापती बांधकाम प्रदीप पवार, पाणीपुरवठा समिती सभापती अशोक डोके, आरोग्य सभापतीपदी सुजित कुमार सरोवर शिक्षण विभाग समिती सभापती मनीषा देशपांडे महिला व बालकल्याण समिती सभापती प्रियंका तारापूरकर, महिला व बालकल्याण समिती सभापती अनिता ढवळे, व स्थायी समिती सदस्य लक्ष्मण शिरसाट, अँड सुनील वाळूजकर, व माधुरी धोत्रे यांची निवड करण्यात आली



# आव्हानात्मक जागतिक वातावरणात देशाची स्थिर प्रगती दर्शवणारे आर्थिक सर्व्हेक्षण म्हणजे 'सुधारणेच्या एक्सप्रेसचे सर्वसमावेशक चित्र' असल्याचे पंतप्रधानांनी केले अधोरेखित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आज सादर केलेल्या आर्थिक सर्वेक्षणाने भारताच्या 'सुधारणेच्या एक्सप्रेसचे सर्वसमावेशक चित्र' सादर केले आहे. आव्हानात्मक जागतिक वातावरणातही देशाची स्थिर प्रगती या सर्व्हेक्षणातून दिसून येते. पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले की, आर्थिक सर्व्हेक्षण मजबूत समग्र आर्थिक मूलभूत तत्त्वे, शाश्वत वाढीची गती आणि राष्ट्र उभारणीमध्ये नवोन्मेष, उद्योजकता आणि पायाभूत सुविधांची वाढती भूमिका अधोरेखित करते. ''हे सर्वेक्षण सर्वसमावेशक विकासाचे महत्त्व अधोरेखित करते, त्यामध्ये शेतकरी, एमएसएमई, युवा रोजगार आणि सामाजिक कल्याणावर लक्ष केंद्रित केले आहे. हे उत्पादन मजबूत करण्यासाठी, उत्पादकता वाढवण्यासाठी आणि विकसित भारत बनण्याच्या दिशेने आपला प्रवास वेगवान करण्यासाठीचा आराखडा देखील मांडते,'' असे मोदी म्हणाले.

केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन यांच्या 'एक्स'वरील पोस्टला उत्तर देताना पंतप्रधान मोदी म्हणाले:

''आज सादर केलेले आर्थिक सर्वेक्षण भारताच्या 'सुधारणेच्या एक्सप्रेस'चे सर्वसमावेशक चित्र सादर करते, जे आव्हानात्मक जागतिक वातावरणात स्थिर प्रगती दर्शवते.

हे मजबूत समग्र अर्थशास्त्राची मूलभूत तत्त्वे, शाश्वत वाढीची गती आणि राष्ट्र उभारणीमध्ये नवोपक्रम, उद्योजकता आणि पायाभूत सुविधांची वाढती भूमिका अधोरेखित करते. हे सर्वेक्षण सर्वसमावेशक विकासाचे महत्त्व अधोरेखित करते, त्यामध्ये शेतकरी, एमएसएमई, युवा रोजगार आणि सामाजिक कल्याण यावर लक्ष केंद्रित केले आहे. हे उत्पादन क्षेत्राला बळकट करण्यासाठी, उत्पादकता वाढवण्यासाठी आणि विकसित भारत बनण्याच्या दिशेने आपला प्रवास वेगवान करण्यासाठीचा आराखडा देखील मांडते. या सर्वेक्षणाद्वारे मिळालेल्या माहितीमुळे सुजाण धोरणनिर्मितीसाठी मार्गदर्शन मिळेल आणि भारताच्या आर्थिक भवितव्यावरील विश्वास दृढ होईल.'' रस्ते, घरे, नळाच्या पाण्याची जोडणी आणि डिजिटल कनेक्टिव्हिटीसह ग्रामीण पायाभूत सुविधांमध्ये वेगवान प्रगती

रस्ते, गृहनिर्माण, नळाद्वारे पाणी जोडण्या आणि डिजिटल कनेक्टिव्हिटीसह मजबूत पायाभूत सुविधा समावेशकतेसाठी महत्त्वपूर्ण आहेत, कारण त्या समुदायांना बाजारपेठ, सेवा आणि जीवनमान वाढवणाऱ्या संधींशी जोडतात, असे केंद्रीय अर्थ आणि कंपनी व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन यांनी आज संसदेत आर्थिक सर्वेक्षण २०२५-२६ सादर करताना सांगितले. सरकारने २५ डिसेंबर २००० रोजी प्रधानमंत्री ग्राम सडक योजना ज्याला पीएमजीएसवाय-१ म्हणून संबोधले जाते, सुरू केली. या योजनेचा मुख्य उद्देश संपर्क सुविधा न मिळालेल्या ग्रामीण भारतातील पात्र वस्त्यांना (२००१ च्या जनगणनेनुसार मैदानी भागात ५०० आणि त्याहून अधिक व्यक्ती आणि डोंगराळ आणि पूर्वोत्तर भागात २५० आणि त्याहून अधिक व्यक्ती) सर्व प्रकारच्या हवामानाला अनुकूल रस्ते जोडणी प्रदान करणे हा होता. १५ जानेवारी २०२६ पर्यंत, ९९.६ टक्क्यांहून अधिक पात्र कुटुंबांना संपर्क सुविधा प्रदान करण्यात आली आहे. शिवाय, पीएमजीएसवाय-१ अंतर्गत १,६४,५८१ रस्ते (६,४४,७३५ किमी) आणि ७,४५३ पूल मंजूर करण्यात आले आहेत आणि १,६३,६६५ रस्ते ((६,२५,११७ किमी) आणि ७,२१० पूल बांधून पूर्ण झाले आहेत. 'सर्वांसाठी घरे' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, प्रधानमंत्री आवास योजना -ग्रामीण १ एप्रिल २०१६ पासून राबविण्यात येत आहे. २०२९ पर्यंत ग्रामीण भागातील कच्च्या आणि मोडकळीस आलेल्या घरांमध्ये राहणाऱ्या सर्व पात्र बेघर कुटुंबांना मूलभूत सुविधांसह ४.९५ कोटी पक्की घरे उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. राज्येकेंद्रशासित प्रदेशांना एकूण ४.१४ कोटी घरांचे लक्ष्य देण्यात आले होते , त्यापैकी ३.८६ कोटी घरे मंजूर करण्यात आली आहेत आणि आतापर्यंत २.९३ कोटी घरांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

ग्रामीण भागात 'हर घर जल' चे महत्वाकांक्षी लक्ष्य पूर्ण करण्यासाठी, सरकार ऑगस्ट २०१९ पासून राज्यांबरोबर भागीदारीत जल जीवन मिशन राबवत आहे. सुरुवातीच्या काळात केवळ ३.२३ कोटी (१७ टक्के) ग्रामीण कुटुंबांकडे नळ जोडणी होती . २० नोव्हेंबर २०२५, पर्यंत, १२.५० कोटींहून अधिक कुटुंबांना नळ जोडणी देण्यात आली. ज्यामुळे एकूण व्याप्ती सुमारे १५.७४ कोटी (८१.३१टक्के) पर्यंत वाढली आणि ग्रामीण कुटुंबांचे राहणीमान सुधारले.

डिसेंबर २०२५, पर्यंत, स्वामित्व योजनेअंतर्गत ड्रोन सर्वेक्षण ३.२८ लाख गावांमध्ये पूर्ण झाले आहे. ड्रोन सर्वेक्षणासाठी ३.४४ लाख अधिसूचित गावांचे लक्ष्य होते. सुमारे १.८२ लाख गावांसाठी २.७६ कोटी मालमत्ता कार्ड तयार करण्यात आली आहेत. आघाडीच्या खत कंपन्यांनी २०२३-२४ मध्ये त्यांच्या स्वतःच्या संसाधनांचा वापर करून बचत गटाच्या ड्रोन दिदींना १,०९४ ड्रोन वितरित केले, त्यापैकी ५०० ड्रोन नमो ड्रोन दिदी योजनेअंतर्गत प्रदान करण्यात आले.

# पिंपळे गुरव येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पिंपळे गुरव (प्रतिनिधी):

आज २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ह्युमन सोशल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या वतीने पिंपळे गुरव येथे ध्वजवंदन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात नवनिर्वाचित नगरसेविका पल्लवीताई महेश जगताप यांच्या शुभहस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नवनिर्वाचित नगरसेवक शामभाऊ जगताप तसेच नगरसेवक ज्ञानेश्वर उर्फ माऊली जगताप उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष कैलास गहिनीनाथ बनसोडे यांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. तसेच संस्थेच्या सचिव सुरेखा कैलास बनसोडे यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगितले.

या ध्वजवंदन कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी सोनाली पवार, बबिता राजपूत,वैशाली कांबळे, सुकुमार बनसोडे, आशा चव्हाण,धनश्री वनशिवे, मनीषा खंडाळे, मनीषा डिमिटरी, ज्योती विश्वासराव, रेखा क्षीरसागर, अमृता काटे, प्रकाश वनशिव,सचिन कुऱ्हाडे, पोपट केंजळे, नितीन भोसले, आनंदा चव्हाण यांच्यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशभक्तीपूर्ण वातावरणात राष्ट्रध्वजाला मानवंदना देत प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

# कोठुरे येथे स्वा. सावरकर विद्यालयात ७७ प्रजासत्ताक दिन साजरा




निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील कोठुरे येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी उपस्थितांचे स्वागत करून विद्यालयाच्या वतीने कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक सातपुते एस. एल. यांनी केले.राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण कोठुरे गावचे भूमिपुत्र व सैन्यात कार्यरत असलेले अमित मच्छिंद्र मोगल यांच्या हस्ते करण्यात आले असून तसेच स्काऊट गाईड ध्वजाचे ध्वजपूजन व ध्वजारोहण अमित कडलग यांच्या हस्ते करण्यात आले भडांगे के आर यांनी ध्वजारोहण सुचना आणली व अनुमोदन निकम एस.बी यांनी दिले असून राष्ट्रगीत ध्वजगीत राज्य गीत सादर करण्यात आले. विद्यालयाच्या वतीने एम.सी.सी चे विद्यार्थी यांनी ध्वजाला मानवंदना देऊन एम.सी.सी चे संचालन सादर केले त्यावेळी उपस्थितांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले त्याचबरोबर शासन परिपत्रकानुसार सार्वजनिक कवायतीचे आयोजनही करण्यात आले कवायतीचे.यासाठी त्यांना क्रीडा शिक्षक अशोक भुसारे यांचे मार्गदर्शन लागले. यावेळी ग्रामस्थ पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# National Geographic India छायाचित्रण स्पर्धेत राहुल गोडसे यांची टॉप थ्रीमध्ये झेप

## मंदिर समितीकडून अभिनंदन व सन्मान







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राष्ट्रीय पातळीवरील अत्यंत प्रतिष्ठेच्या National Geographic India Photography Contest - CaptureInMotion या स्पर्धेत टॉप तीन विजेत्यांमध्ये स्थान मिळविल्याबद्दल छायाचित्रकार राहुल गोडसे यांचा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते गौरव व सन्मान करण्यात आला.

या स्पर्धेसाठी राहुल गोडसे यांनी हुलजंती (ता. मंगळवेढा) येथे भरलेल्या यात्रेतील छायाचित्रांचा समावेश सादर केला होता. यात्रेतील भाविकांचे भावविश्व, श्रद्धा, लोकजीवन, हालचाल आणि क्षणांचे जिवंत दर्शन त्यांच्या छायाचित्रांतून प्रभावीपणे उलगडले असून, त्या छायाचित्रांनी परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. National Geographic India सारख्या जागतिक स्तरावरील प्रतिष्ठित संस्थेने त्यांच्या छायाचित्रण कलेची दखल घेत छर्री त्रशे खपवळर कडून सन्मानचिन्ह, स्टोरी बॉक्स तसेच विजेत्यांचे छायाचित्र पुस्तक प्रदान केले आहे. हा सन्मान केवळ एका छायाचित्रापुरता मर्यादित नसून, त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचा, कलात्मक दृष्टीकोनाचा आणि छायाचित्रण प्रवासाचा गौरव असल्याचे यावेळी ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी नमूद केले.

उल्लेखनीय बाब म्हणजे, राहुल गोडसे हे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडे छायाचित्रकार म्हणून कंत्राटी तत्त्वावर कार्यरत आहेत. मंदिर समितीच्या माध्यमातून त्यांच्या कलेला मिळालेल्या व्यासपीठामुळे त्यांच्या कार्याला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाल्याचा गौरव कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी व्यक्त केला. आतापर्यंत गोडसे यांना नामवंत संस्थांकडून सुमारे १० ते १२ पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. यापूर्वी सन २०२३ मध्ये मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी त्यांच्या छायाचित्राचा मन की बात या कार्यक्रमात विशेष उल्लेख केला होता. तसेच महाराष्ट्र शासनाकडून त्यांना यापूर्वी दोन वेळा गौरविण्यात आले आहे.

या सन्मानप्रसंगी सल्लागार परिषद सदस्य ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर, ह.भ.प. चंद्रशेखर महाराज देगलूरकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक संदेश भोसले, लेखाधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत, राजेंद्र सुभेदार, संजय कोकिळ, राजेश पिटले आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी गोडसे यांच्या यशाबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांचे हे यश परिसरातील तसेच राज्यातील नवोदित छायाचित्रकारांसाठी प्रेरणादायी ठरत असून, भविष्यातही त्यांच्या लेन्समधून समाजातील वास्तव, श्रद्धा व संवेदना प्रभावीपणे जगासमोर येतील, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# श्रीक्षेत्र अक्कलकोट नगरपरिषदेच्या सहा विषय समित्यांच्या सभापतीपदांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : श्रीक्षेत्र अक्कलकोट नगरपरिषदेच्या सहा विषय समित्यांच्या सभापतीपदांची निवड आज नगरपरिषदेच्या सभागृहात शांततामय वातावरणात पार पडली. नगरपरिषदेत स्पष्ट बहुमत असलेल्या भारतीय जनता पक्षाचे या सर्व विषय समित्यांवर एकतर्फी वर्चस्व कायम राहिले असून, सर्व निवडी अविरोध झाल्या. पक्ष नेतृत्वाने नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांना जबाबदारीची संधी देत सभापतीपदांची धुरा सोपविली आहे.

या निवडीत सार्वजनिक बांधकाम विभाग समितीच्या सभापतीपदी सद्दामहुसेन शेरीकर, शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समितीच्या सभापतीपदी कुमारी अपर्णा सिध्दे, स्वच्छता, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापतीपदी अविनाश मडीखांबे, पाणीपुरवठा व जलनिस्सारण समितीच्या सभापतीपदी देविदास कवटगी, महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी सोनाली शिंदे, तर नियोजन व विकास समितीच्या सभापतीपदी उपनगराध्यक्ष ऋतुराज राठोड यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या निवडींसंदर्भात भाजप गटनेते यशवंत धोंगडे यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे शिफारसपत्र सादर केले. आमदार सचिन कल्याणशेट्टी व नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट नगरपरिषदेत २५ पैकी २२ जागांवर भाजपने भक्कम बहुमत प्रस्थापित केले आहे. बैठकीत पीठासीन अधिकारी म्हणून मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी काम पाहिले.

निवड प्रक्रियेदरम्यान कार्यालयीन अधीक्षक शैलेश बिराजदार, पाणीपुरवठा अधिकारी मनोजकुमार ईश्वरकट्टी, तसेच अमोल भांमरे, अभिषेक काकडे, शुभम माहुरे, धनंजय शेळके यांनी सहकार्य केले. यावेळी ज्येष्ठ नेते यशवंत धोंगडे, नगरसेवक महेश इंगळे, नन्नू कोरबू, नाविद डांगे, तम्मा शेळके, कांतू धनशेट्टी, स्वीकृत नगरसेवक प्रवीण शहा, तसेच संजय घोडके, अशोक जाधव, मुस्तफा बळोरगी, भागूबाई नागराज कुंभार यांच्यासह मोठ्या संख्येने नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

# पडघ्यात नागरिकांना 'माविम मित्र मंडळ समाज सुधारक' पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : ग्रामीण भागात महिला बचत गटांना सक्रिय सहकार्य करणाऱ्या पुरुष बांधवांचे प्रोत्साहन वाढवण्यासाठी महिला सक्षमीकरण आणि सामाजिक बदलामध्ये योगदान देणाऱ्या पुरुषांचा सन्मान व्हावा म्हणून ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महिला आर्थिक विकास महामंडळ, ठाणे (महाराष्ट्र शासन अंगीकृत) नवतेजस्वीनी कार्यक्रम अंतर्गत भरारी लोकसंचलित साधन केंद्र पडघा, ता. भिवंडी, जि. ठाणे. यांच्या वतीने 'माविम मित्र मंडळ समाज सुधारक' पुरस्काराने पडघा परिसरातील नागरिकांना यावेळी सन्मानित करण्यात आले. यावेळी शिवसेना नेते प्रकाश पाटील व आमदार शांताराम मोरे यांच्या हस्ते पडघे विभागातील अनेक नागरिकांना 'माविम मित्र मंडळ समाज सुधारक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सी.एम. आर.सी व्यवस्थापक विद्या गायकवाड यांनी उपस्थित नागरिकांना महिला आर्थिक विकास महामंडळाची माहिती दिली. तसेच कार्यक्रम बाबत प्रस्तावना केली यावेळी सरपंच सायली पाटील, उपसरपंच चंदा साळुंके, पंचायत अधिकारी भास्कर घुडे, सी.एम. आर.सी व्यवस्थापक विद्या गायकवाड, सी.एम. आर.सी स्टाफ तर आदी उपस्थित होते.

# खामसवाडी येथे मोफत सर्व रोग निदान शिबिर संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी/ हनुमंत पाटुळे,( प्रतिनिधी) कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त दि.२६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते ०२ या वेळेत सर्व रोग निदान आरोग्य शिबिर (नाममात्र शुल्क ५०रु) ठेवण्यात आले होते. या प्रसंगी या शिबिराचे उद्घाटन मान्यवर सर्व डॉक्टर यांच्या हस्ते धन्वंतरी देवीच्या प्रतिमेचे पुजन करुन करण्यात आले. या वेळी सर्व रोग निदान शिबिरात एकुण १०१ नागरिकांची तपासणी करण्यात येऊन योग्य उपचार करण्यात आले. तसेच त्यांना औषध गोळ्यांचे ही वाटप करण्यात आले. या प्रसंगी रुग्णांना तज्ञ डॉक्टर्स डॉ. किरण विलासराव माने,(पोटविकार यकृत विकार विशेषज्ञ आणि एन्डोकोपिस्ट चैतन्य सुपर स्पेशालिटी क्लिनिक लातूर), डॉ. स्नेहा किरण माने पाटील (नेत्ररोग तज्ञ आणि आहार तज्ञ चैतन्य केअर सुपर स्पेशलिटी क्लीनिक लातूर), डॉ. अभिजीत यादव (छाती विकार तज्ञ फिनिक्स हॉस्पिटल लातूर), डॉ. स्वप्नील शेळके (स्त्री रोग तज्ञ यशोदा मॅटरनिटी हॉस्पिटल लातूर), डॉ अजित देशमुख (अस्थिरोग तज्ञ देशमुख हॉस्पिटल कळंब), डॉ. सुशील पवार (हृदयरोग व मधुमेह तज्ञ पवार हॉस्पिटल कळंब), डॉ. उदयसिंह हुंबे (जनरल फिजिशियन व सर्जन कळंब), डॉ. व्हि. वाय. पवार (डेंटल सर्जन पवार डेंटल क्लिनिक कळंब), अथर्व मेडिको लातूर, अथर्व लॅबोरेटरी कळंब यांनी तपासणी करून उपचार केले. तर डॉ. वसुंधरा आडसुळ, डॉ स्नेहा पाटील, अथर्व लॅब दिपक शेळके, अथर्व मेडिकल ऋषि वाघमारे, सोनाली जाधव, अशोक गायकवाड, सागर भालेराव, बाबा शिरसाट, मुख्याध्यापक मोरे, शिवराज बाकले, शांतलिंग लोखंडे, दिगंबर शेळके, अशोक बापू शेळके, सुनिल पाटील, गोपाळ शेळके, सोमनाथ हिरे, समीर शेळके, बालाजी कोळी, बिभीषण शेळके, शिवाजी शेळके, सचिन हिलकुटे, बालाजी भोसले, सुधाकर सावंत, पत्रकार हनुमंत पाटुळे यांनी आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या आरोग्य शिबिरात नागरीकांकडुन जमा झालेले नाममात्र शुल्क जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खामसवाडी यांना मदत निधी देण्यात येणार असल्याचे आरोग्य शिबिराचे आयोजन दीपक शेळके यांनी यावेळी सांगितले.

# निफाड उपजिल्हा रुग्णालयात महिला वर्गाकारिता दर बुधवारी विशेष तपासणी शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जिल्हा रुग्णालय नाशिक येथील जिल्हा शल्यचिकित्सक व निवासी वैद्यकीय अधिकारी यांच्या आदेशानुसार व उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे वैद्यकीय अधिक्षक डॉ राजीव तांभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला वर्गासाठी दर बुधवारी विशेष आरोग्य तपासणी करण्यात येणार असून याबाबत स्त्रीरोग तज्ञ डॉ रामेश्वर गोराडे यांनी सांगितले की मेनोपॉज म्हणजे स्त्रीच्या आयुष्यातील नैसर्गिक टप्पा. साधारणतः ४५ ते ५५ वर्षांच्या दरम्यान मासिक पाळी कायमची थांबते, तेव्हा या अवस्थेला मेनोपॉज म्हणतात.

महिलाना सलग १२ महिने मासिक पाळी न येणे म्हणजे मेनोपॉज झाल्याचे समजले जाते. या काळात शरीरातील इस्ट्रोजेन व प्रोजेस्टरॉन हार्मोन्स कमी होतात. तसेच मेनोपॉजमुळे होणारे त्रास / लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत

अचानक गरम होणे, जास्त घाम येणे, झोप न लागणे / झोपेत खंड, थकवा व अशक्तपणा, डोकेदुखी, चक्कर येणे, सांधेदुखी, पाठदुखी, वजन वाढणे, त्वचा कोरडी होणे, केस गळणे, योनी कोरडेपणा, जळजळ, लैंगिक इच्छा कमी होणे आदि महत्वाची माहिती डॉ. गोराडे यांनी दिली. उपजिल्हा रुग्णालयाचे कार्यरत स्त्रीरोग तज्ञ डॉ. निलेश लाड यांनी माहिती दिली की, महिलांमध्ये मानसिक व भावनिक लक्षणे खालील प्रमाणे आढळतात.

चिडचिडेपणा, नैराश्य, उदासी, चिंता, घाबरटपणा, स्मरणशक्ती कमी होणे, एकाग्रतेचा अभाव, आत्मविश्वास कमी वाटणे.

तसेच मेनोपॉजमुळे महिलांमध्ये होणारे संभाव्य आजार बाबत सांगितले की,

हाडे ठिसूळ होणे, हृदयविकाराचा धोका वाढणे, मधुमेह, उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल वाढणे व शेवटी मेनोपॉजवरील उपचार व काळजीबाबत सांगितले की, ज्या महिलाना वरील लक्षणे किंवा त्रास होत असेल त्या महिलांनी डॉक्टरांच्या सल्लयाने हार्मोन थेरपी, कॅल्शियम व व्हिटॅमिन D सप्लिमेंट्स, झोप, चिंता किंवा नैराश्यासाठी औषधे, मात्र स्वतःहून औषधे घेऊ नयेत. नेहमी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

महिलांनी दररोज आहार व जीवनशैलीत खालील बदल करावे त्यात योग्य आहार, कॅल्शियमयुक्त पदार्थ: दूध, दही, ताक, पनीर,हिरव्या पालेभाज्या, फळे व कोरडे मेवे, सोयाबीन, हरभरा, डाळी, भरपूर पाणी प्या.

महिलांनी टाळावयाच्या सवयी

जास्त चहा-कॉफी, तिखट, तेलकट व जंक फूड, धूम्रपान व मद्यपान करू नये. त्याऐवजी दररोज व्यायाम व योग करावा,नियमित चालणे, योगासनं व प्राणायाम, ध्यान (Meditation), हलका स्ट्रेचिंग व्यायाम

शेवटी उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील कार्यरत वैद्यकीय अधिक्षक डॉ राजीव तांभाळे यांनी सांगितले की, मेनोपॉज हा आजार नसून नैसर्गिक प्रक्रिया आहे. योग्य माहिती, समजूत, संतुलित आहार, व्यायाम व डॉक्टरांचा सल्ला घेतल्यास या काळातही स्त्री आरोग्यदायी व आनंदी जीवन जगू शकते असे प्रतिपादन केले. तसेच उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे दर बुधवारी सकाळी १० ते १ वेळेस सर्व महिलांनी या अभियानाचा लाभ घ्यावा.

# उल्हासनगर महापालिकेत शिवसेनेच्या अश्विनी कमलेश निकम महापौरपदी, तर भाजपचे अमर लुंड उपमहापौर पदासाठी निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे : उल्हासनगर महापालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी आज शिवसेना - भाजपा - साई पक्ष - टीम ओमी कलानी - वंचित बहुजन आघाडी - रिपाई - पीआरपी महायुतीच्या दोन्ही उमेदवारांनी अर्ज दाखल केले. यावेळी महापौर पदासाठी शिवसेनेच्या अश्विनी निकम यांनी तर उपमहापौर पदासाठी भाजपाचे अमर लुंड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी कल्याण लोकसभा खासदार डॉ श्रीकांत शिंदे उपस्थित होते . ३ फेब्रुवारी रोजी हे दोन्ही उमेदवार महापालिकेचा पदभार स्विकारतील

नागरिकांनी उल्हासनगर मध्ये शिवसेना आणि भाजपाला मोठया0संख्येने मतदान केले. यामुळे उल्हासनगर महापालिकेत महायुतीची सत्ता येणार हे निश्चित होते. यामुळे उल्हासनगरमध्ये आज विरोधकच उरला नाही, अशी स्थिती आहे. नागरिकांनी मोठया संख्येने मतदान करून दाखवलेला हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी उल्हासनगरचे महापौर, उपमहापौर आणि सर्व नगरसेवक हे एकजुटीने काम करतील आणि शहराच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना यावेळी कल्याण लोकसभा खासदार डॉ श्रीकांत शिंदे व्यक्त केला. तर मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्रजीं फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांच्यासह भाजपा प्रदेशाध्यक्ष मा.श्री. रवींद्र चव्हाण यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी आमदार डॉ.बालाजी किणीकर, आमदार कुमार आयलानी, जिल्हाध्यक्ष गोपाळ लांडगे, भाजपचे नाना बागुल, साई पक्षाचे जीवन ईदनानी, माजी आमदार सुरेश उर्फ पप्पू कलानी, यांच्यासह महायुतीचे सर्व नगरसेवक, स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**गोरगरिबांची चांगले नेतृत्व गेल्याची संपर्कप्रमुख महेश नाना साठे यांची प्रतिक्रिया**

# राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांना शिवसेनेकडून श्रद्धांजली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याची उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या बारामती येथे विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याने, सबंध महाराष्ट्रावर शुभकाळा पसरली होती.

पंढरपुरातील शिवसेनेच्या वतीने जिल्हा परिषद, पंचायत समिती, निवडणूक प्रचाराचा शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा विमान दुर्घटनेतून मृत्यू झाल्याचे वृत्त समजतात शिवसेनेकडून सर्व कार्यक्रम रद्द करून राज्याची उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना शिवसेनेच्या वतीने संपर्कप्रमुख महेश नाना साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार हे सर्वसामान्य आणि शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारी राज्यातील महत्त्वाचे नेते होते. सडेतोड देहबोली आणि जातीपातीचा विचार न करता काम करणारा नेता म्हणून त्यांची ओळख होती व त्यांच्या जाण्याने सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

आजचा दिवस हा काळा दिवस असून देशातील नागरिकांच्या मनाला चटका लावणारा दिवस ठरला असल्याचे सांगत अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देताना शिवसेना संपर्कप्रमुख महेश नाना साठे यांना अश्रू अनावर झाले होते.

यावेळी अनेकांनी अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देऊन त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली याप्रसंगी लक्ष्मी टाकळीचे माजी, आरपीआयची नेते आप्पासाहेब जाधव, शिवसेना टाकळी जिल्हा परिषद गटाचे उमेदवार दीपक चंदनशिवे, राष्ट्रवादीचे खर्डी गाण्याची उमेदवार शत्रुघनदिवे, शिवसेनेच्या टाकळी गावाच्या उमेदवार रोहिणी साठे, सूर्यकांत भोसले माणिक सय्यद यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त पंढरपुरात कविसंमेलन उत्साहात संपन्न

## सामंजस्य करारांतर्गत कविसंमेलनाचे आयोजन, मान्यवरांची उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्था संचलित पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालय येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी विभाग व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सामंजस्य करारांतर्गत कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव हे होते. या कार्यक्रमासाठी निमंत्रित कवी म्हणून सोलापूर येथील कवी साबीर वाणी या नावाने लेखन करणारे बदीउज्जमा बिराजदार, कवी कालिदास चवडेकर तसेच पंढरपूर येथील प्रसिद्ध गझलकार वैभव कुलकर्णी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या व्यासपीठावर महाराष्ट्र साहित्य परिषद, पंढरपूर शाखेचे सिद्धार्थ ढवळे, कल्याण शिंदे, अशोक माळी, जैनुद्दीन मुलाणी आदी मान्यवर उपस्थित



होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व कवींचा परिचय मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे यांनी करून दिला.

कविसंमेलनाची सुरुवात गझलकार वैभव कुलकर्णी यांनी श्री विठ्ठल देवतांवरील गझल गायनाने केली. विठ्ठलाशी संबंधित अनेक भावपूर्ण रचना त्यांनी सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कवी कालिदास चवडेकर यांनी प्रेम, सामाजिक आणि जीवनविषयक कविता सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कवी साबीर यांनी सादर केलेल्या 'आई' या कवितेस श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्यांनी सामाजिक समता, राष्ट्रभक्ती व मानवी मूल्यांवर आधारित कविता सादर केल्या. यावेळी त्यांनी त्यांच्या वडिलांनी केलेल्या सरल, सुलभ व सुबोध संस्कृत भाषेतील भावानुवादित कुराण ग्रंथ महाविद्यालयास भेट दिला.

या कविसंमेलनात प्रा. नेहा देसाई, प्रा. स्नेहल जाधव तसेच विद्यार्थिनी स्वाती मनगिनी, ज्योती आनंद भोईटे व वैष्णवी व्यवहारे, शुभांगी वाघमारे, प्रगती लवटे, श्रावणी पवार यांनीही आपल्या स्वरचित कवितांचे सादरीकरण केले. या कार्यक्रमास डॉ. दत्तात्रय डांगे, प्रा. हरिभजन कांबळे, डॉ. बापूसाहेब घोडके, प्रा. अंकुश घुले, प्रा. मोहिनी सावंत यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार कल्याण शिंदे यांनी मानले.

# आपल्या समाजाच्या आणि गावच्या विकासासाठी वंचित बहुजन आघाडीच्या हक्काच्या उमेदवाराला विजयी करा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका ह्या ग्रामीण भागाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असून आपल्या ग्रामीण भागातील विकासाच्या दृष्टीने आपल्या समाजाच्या आणि पर्यायांना गावच्या विकासासाठी आपला हक्काचा माणूस वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी जळकोट ता. तुळजापूर येथे बोलताना केले.

होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये तुळजापूर तालुक्यातील जळकोट गटांतर्गत येणाऱ्या जळकोट पंचायत समिती गणातुन निवडनूक लढविणारे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार परमेश्वर लोखंडे आणि नंदगाव गट अंतर्गत येणाऱ्या खुदावाडी पंचायत समिती गणातून निवडणूक लढवत असलेले वंचित बहुजन आघाडीचे

### युवा नेते सुजित आंबेडकर यांचे मतदारांना आवाहन

उमेदवार परमेश्वर कांबळे यांच्या प्रचारार्थ वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी धावती भेट दिली असता जळकोट येथे कार्यकर्त्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.प्रारंभी जळकोट भिम नगर येथे असलेल्या महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्प-हार घालून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना ते म्हणाले की शेतकरी शेतमजुरांच्या न्याय हक्कासाठी शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळण्यासाठी आणि कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याच्या सुविधेसाठी वीज पाणी रस्ते यांच्या सुविधा करिता वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार यांनाच मतदान करून प्रचंड मतांनी विजयी करावे. या प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य नितीन ढेपे तुळजापूर तालुका अध्यक्ष गोविंद भंडारे माजी जिल्हाध्यक्ष डॉ.चंद्रशेखर गायकवाड,सतीश माने, प्रकाश लोखंडे, सागर लोखंडे,प्रवीण मुखरे,प्रदीप लोखंडे, उमेदवार परमेश्वर लोखंडे,रोहित माने, यशवंत गायकवाड,अरुण माने, वामन लोखंडे,योगेश लोखंडे, मल्लिनाथ माने महिला कार्यकर्त्या वर्षा गायकवाड, राधिका लोखंडे,अशा लोखंडे, प्रज्ञा माने,साधना लोखंडे, हकार्यकर्ते समता सैनिक दलाचे जवान उपस्थित होते.

# शिराढोण येथील बिलाल कुरेशी यांची प्रदेश सचिवपदी नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी/हनुमंत पाटुळे दि.३०(प्रतिनिधी) कळंब तालुक्यातील शिराढोण येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार बिलाल कुरेशी यांची ऑल इंडिया जमेतुल कुरेश संघटनेच्या प्रदेश सचिव पदी निवड करण्यात आली आहे. बिलाल कुरेशी हे शिराढोणचे भूमिपुत्र असुन ते सामाजिक कार्यकर्ते तसेच निर्भीड पत्रकार असुन यांनी आपल्या कार्याचा ठसा पुन्हा एकदा उमटवला आहे. अल्पसंख्याक दिनानिमित्त त्यांना मिळालेल्या सन्मानाने त्यांच्या कार्याची दखल घेतली गेली असुन त्यांची ऑल इंडिया जमेतुल कुरेश (कुरेशी समाज) या राष्ट्रीय संघटनेच्या प्रदेश सचिवपदी निवड करण्यात आली आहे.

समाजहितासाठी सातत्याने झटणारे, वंचित व दुर्लक्षित घटकांचा आवाज बुलंद करणारे बिलाल कुरेशी हे आज नव्या पिढीसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.



पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना न्याय देण्याचा त्यांचा प्रयत्न आणि समाजसेवेतील निष्ठा यामुळेच ही जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

मूर्ती लहान, पण कीर्ती महान ही म्हण बिलाल कुरेशी यांच्या कार्याला अगदी तंतोतंत लागू पडते. त्यामुळेच त्यांना सदरील संघटनेची जबाबदारी देण्यात आली असुन सदरील संघटनेच्या ध्येय धोरणांशी एकनिष्ठता राखुन समाजकार्य करावे असे नियुक्ती पत्रात म्हटले आहे. सदरील नियुक्ती पत्र संघटनेचे प्रदेशाध्यक्ष आरेफभाई चौधरी यांनी ई-मेल द्वारे पाठवले आहे. बिलाल कुरेशी यांच्या निवडीमुळे शिराढोण सह परिसरात सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# नळदुर्ग येथे रिपाइं (आठवले) वतीने अजित दादा पवार यांना श्रद्धांजली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी /प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री राजकीय चळवळीतील एक धाडसी व्यक्तिमत्व नामदार अजित दादा पवार यांच्या दुःखद निधनाबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने नळदुर्ग तालुका तुळजापूर येथे भाव-पूर्ण आदरांजली वाहण्यात आली.



दिनांक २८ जानेवारी २२६ रोजी सकाळी ८.३ दरम्यान महाराष्ट्राचे लाडके नेते एक धुरंदर आणि कार्यकुशल नेतृत्व राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजित दादा पवार यांचे बारामती विमानतळा जवळ विमान अपघातामध्ये दुःखद असे निधन झाले. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल नळदुर्ग येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने श्रद्धांजलीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्राचा एक बुलंद आवाज सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणीला धावून जाणारा सर्वसामान्य लोकांना,सर्व जाती धर्मातील लोकांना समान न्याय देणारं महाराष्ट्राच जाणतं आणि धाडसी असं नेतृत्व काळाच्या पडद्याआड झाल असून त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय चळवळीत कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.अशा भावपूर्ण शब्दात उप-स्थित कार्यकर्त्यांनी दादांना श्रद्धांजली वाहिली.

यावेळी रिपाइं (आठवले) चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, रिपाइंचे जिल्हा सचिव एस. के. गायकवाड, रिपाइं नळदुर्ग सर्कल प्रमुख राजेंद्र शिंदे,रिपाइं (आठवले) अल्पसंख्यांक आघाडी चे तालुका अध्यक्ष बाशीदभाई कुरेशी, कलीम शेख,अकबर शेख, मेहबूब शेख, इनुस इनामदार,राजेंद्र साखरे सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उद्योग व व्यापार विभागाच्या वतीने कोर्टी येथील फाटे ट्रॅक्टर येथे उपमुख्यमंत्री मा.अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उद्योग व व्यापार विभागाच्या वतीने फाटे ट्रॅक्टर कोर्टी पंढरपूर येथे उपमुख्यमंत्री मा. अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी परिसरातील नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अजित दादांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी बोलताना स्थानिक कार्यकर्त्यांनी सांगितले की, अजित दादांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत विकासाची मोठी कामे केली आहेत. प्रशासनावरील पकड आणि कामाचा धडाका यामुळे त्यांची ओळख 'लोकनेता' म्हणून सर्वत्र आहे. त्यांच्या निधनाने राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, अशा शब्दांत उपस्थितांनी शोक व्यक्त केला.

या प्रसंगी नागेश फाटे बोलताना म्हणाले आज आमचे लाडके नेते अजितदादा यांच्याबद्दलच्या या दुर्दैवी वृत्ताने मन सुन्न झाले आहे. दादा म्हणजे केवळ एक नेते नव्हते, तर ते आम्हा कार्यकर्त्यांसाठी एक आधारवड होते. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत जनतेच्या सेवेसाठी झटणारा असा 'कामाचा माणूस' पुन्हा होणे नाही.

प्रशासकीय शिस्त आणि शब्दाला जागणारा नेता कसा असावा, हे आम्हाला दादांकडून शिकायला मिळाले. आज दादा आपल्यात नाहीत यावर विश्वास बसत नाहीये, पण त्यांचे विचार आणि त्यांनी दिलेली विकासाची दृष्टी आम्हाला कायम प्रेरणा देत राहील. आमच्या आयुष्यातील ही कधीही न भरून निघणारी पोकळी आहे. दादा, तुम्ही आमच्या मनात कायम जिवंत राहाल. असे नागेश फाटे म्हणाले.

या श्रद्धांजली सभेला गोरख बागल, संजय पवार, गणेश दुरुगकर, भास्कर गायकवाड, गुलाब मुलांणी, अभिमन्यू पवार , डॉ रमेश फाटे,डॉ.माणिक मस्के,भारत घोडके सर,औदुंबर माने,शुभम फाटे, संतोष पुणेकर, ओंकार कथले, बेबन आदमील मॅडम, समाधान कांबळे, समाधान बागल, विशाल मोरे, किशोर नपते, शरद थिटे, ऋषिकेश बागल, नागेश काळे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कोल्हापूर गडहिंग्लज आगार मार्फत अनिल गणपती पाटील यांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




टाकळीवाडी/प्रतिनिधी : कौलगे जिल्हा कोल्हापूर येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मध्ये कर्तव्यास असलेले अनिल गणपती पाटील ही गेली २० वर्षे चालक म्हणून कार्यरत आहेत.

आतापर्यंत अपघात विरहित आपली सेवा बजावली आहे. यांचा सन्मान गडहिंग्लज आगार व्यवस्थापक श्री गुरुनाथ रणेसाहेब यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

एक यशस्वीरित्या व्यक्तिमत्व म्हणून अनेक चालकांना यातून प्रेरणा मिळेल. गावामध्ये तसेच विभागांमध्ये यांचे कौतुक होत आहे.

## संभाव्य रोगराई आटोक्यात आणण्यात प्रशासनाला यश

# प्रजासत्ताक दिनी चित्ररथातून आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्याचे भव्य प्रदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यात सीना नदीच्या महापुरामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला होता व मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली होती. मात्र या गंभीर आपत्तीत एकाही नागरिकाचा जीवितहानी होऊ न देणे हे जिल्हा प्रशासनाच्या सक्षम आपत्ती व्यवस्थापनाचे मोठे यश ठरले. पूरपश्चात परिस्थिती अत्यंत कौशल्याने हाताळत हवा व पाणी प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळविण्यात आले तसेच संभाव्य रोगराई आटोक्यात आणण्यात प्रशासनाला यश आले.



हे कार्य जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सोलापूर, मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय निधी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा संचलित स्प्रिंट फॉर सी.ई. २०२५ महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रतिसाद प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आले.

या उल्लेखनीय आपत्ती व्यवस्थापन कार्याचे तसेच प्रजनन आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून पुरविण्यात आलेल्या आरोग्य सेवांचे ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सोलापूर शहर पोलीस मुख्यालय येथे आयोजित संचलनात आकर्षक चित्ररथाच्या माध्यमातून सादरीकरण करण्यात आले.

यावेळी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी महाराष्ट्रात दुसरी तयार केलेली आपदासखी व आपदामित्रांच्या समवेत बचाव बोट व आपत्ती व्यवस्थापन कार्याचे प्रभावी पथसंचलन सादर करून सर्वांचे लक्ष वेधले. तर फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनच्या चित्ररथातून प्रजनन आरोग्य व आरोग्य सेवांचे उल्लेखनीय कार्य जनतेसमोर मांडण्यात आले.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, मुंबई मुख्यालयाच्या डायरेक्टर जनरल डॉ. कल्पना आपटे, असिस्टंट डायरेक्टर जनरल अमिता धानू, स्प्रिंट प्रोजेक्ट मॅनेजर डॉ. अमित किटुकले यांचे चित्ररथ प्रदर्शना साठी मार्गदर्शन लाभले. यावेळी एफ.पी.ए.आय. सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन तथा सोलापूर शाखेचे सदस्य डॉ. राजीव प्रधान, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, युवा प्रतिनिधी ऐश्वर्या सावंत व साक्षी सर्वगोड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक आदी मान्यवर उप-स्थित होते.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले व शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे व आमदार देवेंद्र कोठे यांना आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत करण्यात आलेल्या कार्याची सविस्तर माहिती दिली. पालकमंत्र्यांनी या कार्याचे कौतुक करत पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.